# प्रभुतरुण

| वर्ष ४९ | अंक ३ | मुंबई | सप्टेंबर २०१५ | पाने ६ | किंमत रु. १ |
|---|---|---|---|---|---|

(*स्थापना* : तारीख २५ ऑगस्ट १९२३) **तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?**

**www.prabhutarun.org**

*संपादिका:* **सुहासिनी कीर्तिकर** *कार्यकारी संपादक मंडळ :* **मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर**

*सहाय्यक संपादक:* **त्वरिता दळवी, राजेश नवलकर, भक्ती शेटचे**


*संपादकीय*

## हिरवी बोली

—सुहासिनी कीर्तिकर

जून महिन्यात पावसाने दमदार हजेरी लावली. उन्हाळ्याच्या काहिलीनंतर 'सजल श्याम घन गर्जत आले बरसत आज तुषार' म्हणत आकाश पाण्याने खाली लवले, ओलावा घेऊन थेट भेटायला आले. हल्ली मुंबईत तर काय; कोणताही महिना हा रणरणताच असतो. झाडांची कत्तल, मातीचा उपसा, सिमेंटीकरण, प्रदूषण करणारी वाहनं, वाढत्या लोकसंख्येने हवा म्हणजे एक मोठ्ठा उच्छ्वासच, गरम गरम उष्णता वाढवणारी काचेरी घरे, कचरा... इ. सगळ्यांमुळेच कधी नव्हता इतका मे महिन्यात मुंबई चाळीसचा पारा गाठायला लागली आहे. त्यात आणखी उंचावलेल्या रहाणीमानामुळे घरोघरी 'ए.सी.'च्या खिडक्या गरम हवा बाहेर फेकणाऱ्या. पूर्वी चिरेबंदी इमारतींना पक्ष्यांच्या सोयीसाठी गोल गवाक्ष/झरोके असायचे. त्याची जागा आता बंद खिडक्या आणि बाहेर ए.सी.ची खोकी यांनी घेतलीय. सोसायट्यांमध्येही खालची मोकळी जागा चांगली मातीची असायची. बागडणाऱ्या मुलांची पडझड झाली तरी 'पडे, झडे, माल घडे' म्हणत तेथल्याच मातीची एक फुंकर त्या जखमेवर मारली की पुढल्या क्षणाला मूल खेळायला, धडपडायला तय्यार! आता तसं नाही. सोसायटी चकाचक दिसली पाहिजे. तेथे असलेल्या वाहनांनासुद्धा, चाकांना माती लागता कामा नये. मग माती 'मातीत घाला'. तेथे लाद्या बसवा. झाडे पूर्वीपासून असली तर बिचाऱ्यांना सोसायटीत 'वृद्धाश्रमा'सारखा आधार. पण विचारपूर्वक आखणी करून, कचऱ्याचे व्यवस्थापन करून, सांडपाण्याचा निचरा योग्य मार्गाने करून सोसायटीत 'हिरवळ दाटे चोहिकडे' असे चित्रच नाही. नवीन झाडे लावणे नाही. इमारतीच हल्ली 'ढगात' चालल्या आहेत; मग ढग तरी कशाला ओथंबून खाली येणार? म्हणून मग सर्वत्र काहिली. रखरख. अशावेळी जून महिन्यात पावसाने जेव्हा 'मुंबई आमची' म्हणत तिच्यावर वर्षाव केला तेव्हा किती किती छान वाटलं. पण ते तेवढ्यापुरतंच. 'आला जून, गेला जून पाऊस कुठंय आता अजून?' असं म्हणायची वेळ आली आहे. अधूनमधून श्रावण आलाय म्हणून थोडासा झिम्मा खेळतो तो तसा. पण त्याचं काय सांगावं? अगदीच लहरी. भारताच्या उत्तरेला तो पडपड पडतोय. गावंच्या गावं जलमय झालीत. माणसं, गुरं वाहून गेलीत. इकडे महाराष्ट्रातही विदर्भात तो मध्येच बेभान होऊन पडतोय. नद्यांच्या धरणांचे दरवाजे उघडावे लागताहेत. ओला दुष्काळ येतोय.. पण मराठवाड्याकडे बापडा ढुंकूनही बघत नाही. गुरांसाठी गावागावामध्ये 'एकक चाराठिकाण' उघडलं जातंय. बिचारी तडफडताहेत. माणसं दुष्काळामुळे गावातून बाहेर पडताहेत. 'जगण्या'साठी कुठली कुठली दुष्काळी कामं करताहेत. मध्यंतरी वाचनात आलं की दुष्काळात जगणं कठीण म्हणून अनेकजण आषाढीवारीत सामील झाली. निदान तिथे काही ना काही अन्नदान होतं. जगण्याचा हा धर्म पाळणं खरोखर किती कठीण ना?

'धारयेत् इति धर्म' ही व्याख्या अशा विपरीतपणे आपल्या प्रत्ययाला यावी! पण तरीही आपलं मन कुठलं तरी हिरवेपण मनात धरून असतंच. ते नेहमी 'हिरवे रावे'च असले पाहिजेत असं नाही. निसर्गाचं 'हिरवं गोंदण' असलं पाहिजे असं नाही. 'चहुकडे ही भरून राही तुझीच हिरवी जादू' अशी हिरवी जादूच व्हावी लागते असंही नाही. आपल्यासमोर 'हिरवे हिरवे गार गालिचे' पसरलेले असायलाच हवेत असं कुठंय? 'हिरव्या हिरव्या रानाची झाडी घनदाट' कुठून आणि कशी

(पान २ कॉलम १ वर)

## अद्‌भुत गोष्टींचा संग्रह

विनय त्रिलोकेकर

**भूतांच्या गोष्टी-भाग १**

**तीन अनुभव**

*प्रस्तावना*

माझ्या आईला वाचनाची फार आवड होती. तसेच चित्रपट बघणे आणि नंतर एखाद्या पुस्तकातील किंवा पाहिलेल्या सिनेमाची आम्हा सर्वांना गोष्ट सांगणे हा तिचा आवडीचा छंद. ती गोष्टी अतिशय सुंदर आणि आपल्या एका स्वत:च्याच शैलीत सांगत असे. बाबुराव अर्नाळकरांच्या रहस्य कथेतील धनंजय - छोटू किंवा काळा पहाडच्या करामतींचे वर्णन वाचण्यापेक्षा आईच्या तोंडून ऐकणे फारच चांगले वाटायचे. गोष्टीतील बारीकसारीक गोष्टी तिच्या नजरेतून कधीच सुटत नसत. लहान-मोठे प्रसंग असो की मग गोष्टीतील लहान-लहान पात्रांची नावे, सर्व काही इत्थंभूत. अगदी नोकरापासून मालकापर्यंत सर्वांचीच. तिच्याबरोबर पौराणिक चित्रपट बघण्यास फारच गंमत येई. सिनेमातील देव -देवीना ती तर पाया पडायचीच; पण मलादेखील तसे करणे भाग पाडायची. त्रिलोक कपूर (शंकर) व निरुपा रॉय (पार्वती) ह्यांना मी जेवढ्या वेळा नमस्कार केला असेन तेवढ्या वेळा त्यांच्या मुलांनी नक्कीच केला नसेल. एवढेच नव्हे; तर गोकुळअष्टमी एखाद्या फ्लोटमध्ये जरका देव-देविका असल्याच तर नमस्कार करण्यावाचून गत्यंतर नव्हते. गोष्ट सांगण्यात तिचा हातखंडा होता. मग ती एखादी सत्यघटना असो किंवा काल्पनिक गोष्ट. अगदी रस घेऊन सांगायची.

ज्याप्रमाणे तिची देवावर श्रद्धा आणि विश्वास त्याप्रमाणे भूतखेतांवरदेखील. आणि जेव्हाजेव्हा आई तिने किंवा तिच्या वडिलांनी अनुभवलेल्या (भूता-खेतांच्या) घटनांच्या गोष्टी सांगे तेव्हा माझी बहीण, शिभानी (शुभा) व मी, आईला अक्षरश: बिलगून बसत असू.

याप्रमाणे आई गोष्टीला सुरुवात करीत असे,- ''आम्ही सारे, आई-बाबा, आम्ही सहा बहिणी आणि दोन भाऊ, किशोर जन्माला आला नव्हता, तेव्हा गोन्डल्ला राहत होतो. आमच्या बाबांची तेथे रेल्वेचे चीफ इंजिनीयर म्हणून नेमणूक झाली होती. आमच्या बाबांनी गोन्डल्ला इलेक्ट्रीक लाइन पोहचविली (हे सारे छाती फुगवून सांगत असे)...''

(शहानिशा करू शकलो नाही. असो!)

आईच्या पद्धतीने सांगणे कठीण. तिची गोष्ट सांगण्याची लकब माझ्यात नक्कीच नाही. तेव्हा आईने सांगितलेल्या दोन गोष्टी वाचकांपुढे ठेवण्याचा हा माझा एक प्रामाणिक प्रयत्न.

**शंकराचे मंदिर आणि पांढरेशुभ्र पिशाच्च**

रात्रीचा समय होता. पार मध्यरात्र उलटून गेली होती. महादेवराव नेहमीप्रमाणे शंकराच्या देवळात जात होते. नेहमीच इतका उशीर होत असे. रेल्वे वर्कशॉपमधून काम आटपून घरी जाणे, जेवण उरकणे, स्नान करून मग निघणे. तेव्हा उशीर होणे सहाजिकच. देऊळ गावाच्या वेशीवर होते. आजची रात्र काही वेगळी अशी नव्हती. गेले कित्येक महिने माधवरावांचा नाईट 'रूटीन' असावयाचा. मात्र गेले काही दिवस हातात कंदील घेण्याची गरज भासत नव्हती. त्यांच्या स्वकष्टाने आणि राजे सुरेंद्रांच्या आशीर्वादाने, त्यांच्या घरापासून ते थेट मंदिरापर्यंत जाणारी पाऊलवाट दिव्यांच्या झगमगाटाने प्रकाशित झालेली होती. प्रत्येक दहा फुटाच्या अंतरावर उंच-उंच विजेच्या दिव्यांचे खांब पसरले होते आणि त्या दिव्यांच्या प्रकाशामुळे झाडा-झुडुपांच्या चित्र-विचित्र सावल्या पडल्या होत्या. तुमच्या, आमच्यासारखे भीतीने पार गळून पडले असते. पण माधवराव होते अतिशय धीट, खंबीर मनाचे. 'भय' हा शब्द त्यांच्या शब्दकोशात नव्हता.

हां, हां म्हणता त्यांनी घरापासून बरेच अंतर कापले होते व तो वटवृक्षदेखील मागे सोडला होता आणि त्यांची खात्री होती. 'ते' थोड्याच वेळात आपल्याबरोबर येऊन आपल्याशी बोलू लागेल. 'ते' म्हणजे होती एक योनी.

(पान २ कॉलम ३ वर)

(पान १ कॉलम २ वरून)
असणार? नाहीच ना?

पण... पण तरीही हिरवे अंकुर अनेक रूपात आपल्या मनात रुजतात. श्रावण आला की 'पीठात मीठ' कालवून का होईना; (म्हणजे पन्नास रुपये पाव या दराचा वटाणा, ऐंशी रुपये किलो कांदा, पंचवीसला एक शिराळा या दराने मिळणारे 'अन्नब्रह्म' घेऊन बरं का. 'पीठात मीठ' कालवून ही भाषा आपल्या 'स्मृतिचित्रं' वाल्या लक्ष्मीबाई टिळकांची!) सण साजरा करतोच आपण. कुठे मंगळागौरीच्या स्पर्धा, कुठे घागर फुंकणं, कुठे संगीत महोत्सव... असा श्रावण आपल्याशी लाडिवाळपणा करत खेळतो. तेव्हा आत आत मनाच्या खोलवर साचलेलं शेवाळ बाजूला होतं आणि हिरवेपण तरारून येतं. पाण्याची रोजची 'घागर उताणी' असो बापडी अनेक ठिकाणी. पण गोकुळाष्टमीला गोविंदा हंडी फोडत सचैल (म्हणजे कपड्यांसहित) स्नान करतात, भिजतात. थिरकतात. तेव्हा त्यांची मने हिरवीगारच असतात. 'सृष्टीला पाचवा महिना' लागलेला श्रावण आपलंच 'रूप बिलोरी ऐना' पहात लाजरा होतो तेव्हा प्राण्यांमध्येही 'भादवा' रंगतोच. आपली माणसांची मनं श्रावणाचं गीत झंकारताना अनुभवतात. आपल्याला 'सावन मन भावन'च असतो. हिरवेपण निसर्गात असो वा नसो, 'पिवळ्या पानाचा' ही आपला मनरूपी देठ सणावारांनी हिरवाच रहातो.

याच काळात शाळाकॉलेजांमध्ये वेगवेगळ्या चाचणीपरीक्षा सुरू होतात. पण त्याचा जाच जाणवतो का? मुळीच नाही! कारण मन 'उधाण वाऱ्याचं' असतं. आत आत हिरवं काहीतरी रुजवणारं ऋजूपण टिकवणारं असतं. याच महिन्यात हिरवी मैत्री अधिक गहिरी करणारा 'फ्रेंडशिप डे' ही आलेला असतो. या 'डे' ने हिरवाई अधिक गर्द होत जाते, गडद होत जाते. हे महत्त्वाचे आहे.

महत्त्वाचे अशासाठी की अवतीभवती परिस्थितीचा कितीही उन्हाळा असला तरी राखेखाली धग असणारा निखारा असावा तशी आपली जगण्याची उमेद (जीजिविषा) धुगधुगती असतेच. तिचा उष्ण हवाहवासा स्पर्श अनेक सणावारातून, आंनदोत्सवातून, भेटीगाठीतून, आपल्याला होत असतोच. त्यातूनच मग सुंदर जगणे तरारून उठते. हिरवेगार, लसलसते, मनमोहक, चैतन्यमय, घननीळाची कृपा असणारे! तर हे हिरवेपण आपण संचित म्हणून जपायलाच हवे. ते जपायचे असेल तर अहो, आनंदाच्या अनेक वाटा आहेत. त्यातली एक वाट म्हणजे दिवाळी अंक. त्यातली चिरंजीवी साहित्यिक हिरवाई. मंडळी, 'प्रभुतरुणा'च्या दिवाळी अंकासाठी आपलं योगदान देऊन हा सतेज हिरवा जगण्याचा आनंद वाढवणार ना? अनेकांत तुमचीही भर पडू द्या. शेवटी जगणं सुंदर करणं आपल्याच हातात असतं ना? तुमची 'हिरवी बोली' येऊ द्या मग आमच्यापर्यंत. काय?



Mr. Arvind Dharadhar an octogenarian SBI Pensioner is seen receiving a special prize for photography at a well attended function organized by Pathare Prabhu Social Samaj on the Gudi Padva Day this year. Mr. Dharadhar's career in photography started with winning of a medal for the best exhibit at a function organised by the above - mentioned Samaj in 1959 which coincided with his banking career in State Bank during 1955-94.

Mr. Dharadhar participated in number of Photographic exhibitions - Indians & International, winning laurels. He was associated with Photographic society of India, America & Republic of China. International recognistion in photography was matter of fact responsbile for his entry in the Public Relations Dept. of the Bank.

Mr. Dharadhar was not only a regular contributor to Colleague - House magazine of SBI but his photographs appear in the annual report of State bank of India also. Mr. Dharadhar was one of judges to Judge the entries of the Photographic section of Maharashtra Art Exhibition in 1971. Mr. Dharadhar was receipeint of appreciation from the Bank Chairman from time to time.

Photography played an important part of his life & found full support from his wife Praneeta. Mr Dharadhar is blessed with two sons & two Grandsons & playing his 2nd inning with them.

(श्री. अरविंद धराधर १९९४ साली निवृत्त झाले. त्यानंतरही 'स्टेट बँक ऑफ इंडिया'च्या 'सेकंड इनिंग'या त्रैमासिक मुखपत्रात घेतली गेली ही नोंद अभिनंदनीय आहे.- -संपादक)

(पान १ कॉलम ४ वरून)
एक पिशाच्च. एक पांढरेशुभ्र पिशाच्च. होय. वडाच्या झाडावरून ते पिशाच एखाद्या श्वापदाप्रमाणे फटाफट सरपटत खाली उतरून वेगाने त्यांच्या दिशेने झेप घेत होते. हे सर्व महादेवरावाने चोरट्या नजरेने ताडले होते. मान वळवून पाठीमागे बघण्याची गरजच नव्हती. हा सर्व प्रकार नियमित घडत होता. ती पांढरी सावली त्यांच्याबरोबर चालू लागली.

आणि मग पिशाच्च बोलू लागले, 'अरे मादवा, ('भूत देवाचे नाव कसे उच्चारणार? आणि माधव म्हणजे शंकर, नव्हे काय?' असे काहीसे ते आपल्या लाडक्या मुलीस समजावीत.) तुला किती वेळा समजवायचे? ही जागा चांगली नाही. तुला धोका आहे. अशा रात्री- अपरात्री फिरणे तुझ्या हिताचे नाही.'

माधवांचे आपले नेहमीचेच उत्तर, 'आपल्याशिवाय इथे दुसरे आहे तरी कोण? आणि आपल्याकडून मला धोका नक्कीच नाही, हे माहीत आहे. तू तर माझे रक्षण करते! घरात आणि देवळात शंकर भगवान काळजी घेतात की.'

'मादवा, तुला समजत कसे नाही, आमच्यासारखे, म्हणजे आमच्या योनीतील काही जण अतिशय दुष्ट आहेत व त्यांचा वापर करतात तुमच्यापैकी काही वाईट माणसे आणि जादूटोणा, भानामतीसारखे अघोरी प्रकार घडवतात. बरे, माझी हद्द इथवरच. मी येथे थांबतो. जा. मी तुझी वाट बघत थांबतो, जा लवकर परत ये.'

देवळाच्या अंगणाचे फाटक उघडून माधवरावांनी देवळापुढील अंगणात प्रवेश केला. बाहेरील नंदीस नमस्कार करून मंदिरात ते शिरले. त्यांना कसलीच घाई करावयाची नव्हती. सोबत आणलेल्या तांब्याच्या लोट्यातल्या पाण्याने शंकराची पिंड हळुवार धुऊ लागले. सवयीप्रमाणे ते तो लोटा आपल्या हातात घट्ट पकडीत आणि त्या घट्ट पकडीमुळे हाताला वेदना होत. पण त्या वेदनांकडे त्यांचे कधीच ध्यान नसायचे. अशी होती त्यांची शिवभक्ती! त्यांना ती रात्र आठवत होती- पिशाच्चाबरोबर होणारी त्यांची ती मुलाखत. त्यांचे ते दचकणे व लोटा हातातून निसटणे- सर्व. आणि सवय होऊन बसली, लोटा घट्ट पकडण्याची. ते आपल्या मनातल्या मनात हसले. स्वत:चेच हसू आले. पिंड धुऊन झाल्यावर सोबत आणलेले दही

(पान ६ कॉलम २ वर)

# SHORT REVIEW OF THE LIFE OF RAO BAHADHUR G. R. KOTHARE

**L.M.E., Ex. M.L.C., PAST PRESIDENT, M.E.A.**

*forwarded by* **Milind Kothare**

The Late Rao Bahadur Gajanan Ramchandra Kothare, the founder of the Mechanical Engineers' Association (India), was born on 18th May, 1869, in the Pathare Prabhu Community.

He belonged to the first batch of successful students of the Victoria Technical Institute with the Diploma of L.M.E. and in 1891, passed the Mechanical Engineers' Examination under the Bombay Boiler Act, in 2nd class.

He succeeded in having his own Ginning Factory of 42 gins at Khamgaon, known as `The Native Ginning Factory'.

He was the developer of cotton business and had handled Agency business for fire insurance, mineral oils, petroleum products and other Industrial requirements.

He founded our Association in 1917, to safeguard our interest, both with the government as well as with the employers, thereby raising the professional status of our class. He was continously the President of the Khamgaon branch of our Association for a number of years and was the Chairman of the reception committee of our session held at Khamgaon in 1923 and the President of another session held at Nagpur in 1932.

He was also a member of the Advisory Board of Industries for C.P. Government and so he could be of great help to our Association in making changes beneficial for the convinience of Engineers and Factories, with regard to Boiler Act and Factories Act. The Factory Owners Association for C.P. and Berar, was also headed by him from the beginning, on to the time, he was confined to bed in his last days.

He was the chief leader of the Khamgaon Cotton Market Committee, Khamgaon Grain Market Committee, Khamgaon Municipality, Khamgaon TalaQ Board, Buldhana District Board, Bench of Honarary Magistrates, Khamgaon Dispensary Committee, Khamgaon Dastur Rattanjee Library and Free Reading Room, Khamgaon Tennis and Sports Club, etc.

As a member, be played a prominent part in the Provisional Cotton Committee, Indian Central Cotton Committee, Educational Board for C.P. and Berar Liheral Association, Indian Liberal Fedration, Public Accounts Committee for C.P. and Berar and C.P. Legislative Council, etc.

He got the title of Rao Bahadur in 1921 and the Silver Jubilee Medal in 1937.

He died on 27th January1942.

ज्ञातीची माहिती ठेवणाऱ्या विश्वास अजिंक्य यांनाही आपल्या पणजोबांची जीनिंग फॅक्टरी होती हे माहीत नव्हते. फार पूर्वी 'प्रभात' मध्ये सरला दत्तात्रय आगासकर (माझी आई) यांनी रावबहादूर कोठारेंबद्दल लिहिले होते तरीही! म्हणूनच पुन्हा ही 'वडिलां'ची कीर्ति!

-संपादक

लेखांक-७

# अर्थसंवाद

-सौ. उर्वशी आनंद धराधर

आज आपण बँकेतून कर्ज घेण्याविषयी पाहू या. बँका या खातेदारांच्या ठेवी सुरक्षित ठेवणे, त्यावर खातेदाराला योग्य व्याज देणे, त्याचबरोबर या ठेवींचा विनियोग रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने घालून दिलेल्या नियमावलीनुसार करत असतात. परवाच आपण वाचले की, मुख्यमंत्र्यांनी शेतकऱ्यांच्या कर्ज माफीचा हुकूम काढला. त्यानंतर त्यांनी तो मागे घेऊन व्याजमुक्तीचा इशारा केला. आपण या बातम्या वाचून नेमके यातून काय साध्य होते यावर विचार करतो.

आज बँकांचे एनपीए म्हणजे नॉन परफॉर्मन्स असेट वाढत असल्याचे आपण वाचतो. म्हणजे काय? बँका कर्जदाराला कर्ज देताना त्याची नीट छाननी करतात. प्रत्येक बँकांचा कर्जावरील व्याज दर, कर्जफेडीची मुदत, कर्जाला लागणारी सिक्युरिटी म्हणजे तारण जामिनदार याचे नियम ठरलेले असतात. त्याचप्रमाणे बँकांचे कर्ज हे कोठल्या कारणांसाठी दिले जाते, त्या कर्जाचा विनियोग योग्यप्रकारे केला जातो की नाही याचे नियम असतात. केवळ तारण म्हणून आपल्याकडे मालमत्ता आहे व म्हणून बँकांनी मला कर्ज द्यावे असे म्हणणे चुकीचे आहे. कर्जाचा पैसा हा लोकांच्या ठेवीतून आलेला असतो. त्यामुळे त्याचा विनियोग हा रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने आखून दिलेल्या मार्गावरून केला जाणे अत्यंत महत्त्वाचे असते. कर्जावरील व्याजदरदेखील ठरवण्याची मुभा बँकांना असते. आज आपण जी बँक उत्तम सर्विस देईल व जी बँक कमीत कमी व्याजदर आकारेल तिथून कर्ज घेण्याचा विचार करतो.

बँकेत कर्जाचा अर्ज देताना त्यांचे नियम व अटी समजावून घेतले पाहिजेत. बँकांच्या वेबसाईटवर आज आपणास सर्व बँकांच्या कर्जविषयक धोरणांची माहिती मिळते. त्याचा नीट अभ्यास करून आपण योग्य ती बँक निवडली पाहिजे. आपणास जर व्यवसायाला कर्ज हवे असेल तर व्यवसायविषयक सर्व कागदपत्रे आपण तयार ठेवली पाहिजेत. आपल्या व्यवसायाचे उद्दिष्ट, आत्तापर्यंत झालेली व्यवसायाची प्रगती म्हणजे गेल्या ३ वर्षाचा वार्षिक अहवाल। आपले केवायसी (नो युवर कस्टमर) ओळख, पॅनकार्ड व पुढील पाच वर्षाचा आपण व्यवसायात जो प्रगतीचा आलेख ठरवला आहे त्याविषयी माहिती, आपण भरत असलेले विक्रीकर व मिळकत विषयक भरलेला उत्पन्नकर या साऱ्यांचा तपशील आपण तयार ठेवून तो बँकेला सादर केला पाहिजे. आपण जर आपल्या व्यवसायाला कोणी जामिन देणार असू तर त्या जामिनदाराची व्यवसाय अथवा नोकरीतील उत्पन्नाची माहिती, त्याचे वय या साऱ्या गोष्टींची माहिती आपणास बँकेला कळवली पाहिजे. शिवाय आपण जर कोणास जामिन राहणार असू तर त्याची सर्व माहिती व्यवसायाची माहिती काम करण्याची निष्ठा व ध्येयवादी व्यक्तिमत्त्व आपणास ज्ञात हवे. अन्यथा आपण जर कोणाला जामिन राहिलो व उद्या त्यांनी बँकेचे हप्ते भरले नाहीत तर बँका जामिन राहिलेल्या इसमास कर्ज भरण्याची नोटीस पाठवते व त्याच्यावर कर्ज फेडण्याची जबाबदारी येते. म्हणून कोणालाही जामिन राहण्यापूर्वी नीट विचार केला पाहिजे.

बँकांच्या कर्जविषयक कागदपत्रांवर सही करण्यापूर्वी त्याची नीट ओळख करून घेणे गरजेचे आहे. त्या कागदपत्रांची एक प्रत आपण बँकेकडून मागून घेऊ शकतो. आपण कर्जदार म्हणून बँकेला याबाबत कसे विचारू म्हणून गप्प बसू नये. आपण कर्जाचा अर्ज सर्व तपशीलासहीत बँकेला दिल्यावर आपले कर्ज लवकरात लवकर किती दिवसात मंजूर होईल ते बँकेने सांगितले पाहिजे.

बीसीएसबीआय (बँकिंग कोड ऑफ स्टँडर्ड बोर्ड ऑफ इंडिया) यांनी बँकांना त्यांच्या वेबसाइटवर त्याबद्दल माहिती देणे बँकांना कायदेशीररित्या सांगितले आहे. त्यामुळे आपल्याला जर ही माहिती नाही मिळाली तर आपण बँकेला त्याबद्दल विचारू शकतो. जर आपले कर्ज तेवढ्या कालावधीत नाही झाले तर त्याबद्दलही विचारणा करू शकतो. आपले कर्ज जर काही कारणांनी नामंजूर झाले तर त्याची कारणे बँकेने आपल्याला सांगितली पाहिजेत.

बँकांकडून कर्ज घेतेवेळी बँकेची कागदपत्रे नीट वाचून पूर्ण भरून मगच त्यावर सही करावी. रिकाम्या कागदपत्रांवर त्यात माहिती न भरता कधीही सही करू नये.

एकदा कर्ज घेतल्यावर त्याचे हप्ते नियमितपणे भरले पाहिजेत. जर काही कारणांमुळे ते हप्ते भरणे शक्य नसेल तर आपल्या बँकेला त्याबद्दल कळविले पाहिजे. अन्यथा बँका आपल्याला सतत नोटीस पाठवून शेवटी ९० दिवसांच्या वर थकबाकी झाल्यास आपला अकाऊंट एनपीए होतो. मग सीबीलच्या नावात जर आपल्या खात्यांची नोंद झाली तर आपणास पुन्हा कधी कर्ज मिळणे दुरापास्त होऊन जाईल. तेव्हा बँकेला जर वेळोवेळी विश्वासात घेऊन आपल्या अडचणी सांगितल्या तर बँका त्यातून तोडगा निश्चित काढतील व आपले कर्ज एनपीए होण्यापासून वाचेल. बँका हे आपले मित्र आहेत. तेव्हा कर्ज फेडण्यास काही अडचणी आल्यास बँकांचे फोन दुर्लक्षित करणे, आपला बदललेला पत्ता बँकेला न कळवणे यासारख्या गोष्टी अजिबात करू नयेत. त्यात आपले मोठे नुकसानच होईल.

तेव्हा आपले कर्ज व्यवसायासाठी असो, शिक्षणासाठी असो. वाहन खरेदी किंवा घर घेण्यासाठी असो, आपण काळजीपूर्वक या सर्व गोष्टी अमलात आणल्या पाहिजेत. चला तर बँकांचे कर्ज हवे त्याप्रमाणे घेऊन वेळेवर फेडूया व आपला व्यवसाय यशस्वी करूया!

फोन: ९८२०५०६०६३

## पाठारे प्रभु सोशल समाज

### कनकाई उत्सव

दिनांक १६-१०-२०१५ रोजी सायंकाळी ६ ते ७।। या दरम्यान पार्ल्याच्या राजपुरीया हॉलमध्ये कनकाई देवीच्या उत्सवात पाठारे प्रभु सोशल समाजातर्फे संगीतनृत्याचा कार्यक्रम करण्यात येणार आहे. सर्व ज्ञातीबांधवांनी या कार्यक्रमास उपस्थित रहाण्याचे आवाहन कार्यकारिणीने केले आहे.


✶ दिनांक २३-८-२०१५ रोजी प्रभु सेमिनरी हायस्कूलच्या सभागृहात सायंकाळी ५ वाजता पाठारे प्रभु सोशल समजाची वार्षिक सर्वसाधारण सभा आयोजित केली होती. ती गणसंख्येच्या अभावी ५.३० वाजता सुरू झाली. अध्यक्षा श्रीमती स्वाती राणे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. सं. चिटणीस सौ. नीता सेंजित व श्री. जयंत कीर्तिकर यांनी सूचनापत्रकातील मुद्दे सभेपुढे ठेवले. ते सर्वसंमत झाले; तसेच नवनिर्वाचित खजिनदार श्री. सतेज तळपदे यांनी सादर केलेला ताळेबंदही एकमताने मंजूर झाला. ताळेबंदासंदर्भात विश्वस्त श्री. माधव जयकर यांनी काही मुद्यांचे स्पष्टीकरण केले. विश्वस्त श्रीमती प्रमिला तळपदे यांनी पदकांसाठी येणाऱ्या देणग्यांची माहिती दिली. बी. के. धुरंधर सुवर्णपदक चालू ठेवण्याबद्दल विश्वस्त श्री. अजित तळपदे यांनी काही सूचना केल्या. श्री. समीर रणजीत यांनी उपस्थितांच्या वतीने आभार मानले.

✶ याच अनुषंगाने पाठारे प्रभु सोशल समाजाने पुढील आवाहन केले आहे- 'बी.ए.'मध्ये प्रथम वर्ग मिळविणाऱ्यास बी. के. धुरंधर सुवर्णपदक दिले जाते. देणगीच्या व्याजातून हे पदक देणे दिवसेंदिवस कठीण होत चालले आहे. तेव्हा ह्या पदकाच्या आजवर मानकरी ठरलेल्यांनी आणि इतर दात्यांनी आर्थिक सहाय्य करावे; जेणेकरून व्याजरकमेत वाढ होऊन सोशल समाज यापुढेही हे मानाचे सुवर्णपदक देऊ शकेल. तेव्हा दात्यांनी सुवर्णपदकासाठी दान देण्याची सुवर्णसंधी साधावी, असे समाजातर्फे कळकळीचे आवाहन!

✶

## हसरी रेखा

-प्रदीप कोठारे



# गुरुपौर्णिमा

सौ. शुभांगी शैलेश धराधर

गुरु: ब्रह्मा गुरु: विष्णु
गुरु: देवो महेश्वरा
गुरु: साक्षात् परब्रह्म
तस्मै श्री गुरवे नम:।

'गुरूपौर्णिमा' आपापल्या गुरूंचे पूजन करण्याचा, त्यांना काही अर्पण करून आपला त्यांच्या ठायी असलेला आदरभाव, पूज्यभाव व्यक्त करण्याचा दिवस. आपल्या भारतात गुरु-शिष्य परंपरा फार मोठी व प्राचीन आहे. पूर्वीच्या काळी गुरुकुल परंपरा होती. अगदी लहानपणापासून मुले विद्याभ्यास करण्यासाठी, शस्त्रविद्या शिकण्यासाठी गुरुंच्या आश्रमात जाऊन राहात. तेथे अभ्यासाबरोबरच आश्रमातील दिवसभरातील सर्व कामे तेथे शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनाच करावी लागत. गुरुपत्नींना 'गुरुमाता' मानले जाई व त्यांच्या आज्ञेप्रमाणे सर्व कामे करावी लागायची. सर्व विद्यार्थी (शिष्य) तेथे 'गुरूबंधू' म्हणून एकत्र रहात. त्यांच्यात भेदभाव नसे; मग तो कुणी राजपूत्र असो की गरीबाघरचा सामान्य मुलगा. तेव्हाचे गुरू त्यांना समान वागणूक देत. तेव्हाचे शिष्यही गुरूंची कुठलीही आज्ञा पाळण्यासाठी मागेपुढे पहात नसत. तेव्हा गुरूंप्रती इतका आदर व भक्ती असायची की गुरूंना परमपिता परमेश्वर मानत. म्हणूनच तर द्रोणाचार्यांनी धनुर्विद्या शिकवण्याचे नाकारल्यावरसुद्धा 'एकलव्याने' त्यांची चरणधूळ घेऊन पुतळा बनवला व त्या पुतळ्यापुढे स्वबळावर धनुर्विद्या शिकला. पण त्याच द्रोणाचार्यांनी जेव्हा त्याचा अंगठा कापून गुरूदक्षिणेच्या रूपात मागीतला, तेव्हा अंगठा दिल्यावर परत कधीही आपण तिरंदाजी करू शकणार नाही हे माहीत असूनही एकलव्याने क्षणाचाही विचार न करता आपला अंगठा कापून द्रोणाचार्यांच्या चरणी अर्पण केला. केवढी ही गुरुभक्ती!

त्याच आपल्या भारतात आज गुरुंचे म्हणजेच आजच्या शिक्षकांचे स्थान काय आहे? त्यांना आज आदर, सन्मान मिळतो? नाही. आजचा विद्यार्थी त्यांचा सरळ-सरळ अपमान करू धजावतो, इतकेच नाही तर बरेच वेळा त्यांच्यावर हातही उचलला जातो. त्यांना अपशब्द बोलले जातात. ह्याचे कारण काय? तर टाळी एका हाताने वाजत नाही. कारण आजचे शिक्षक तरी कुठे त्यांचे कर्तव्य इमाने इतबारे पार पडतात? शाळेत जीव तोडून शिकवण्यापेक्षा खाजगी शिकवण्या घेण्याकडे त्यांचे जास्त लक्ष असते. 'ज्ञानदान' हे एक पवित्र कर्म मानण्यापेक्षा आज तो फक्त अर्थार्जनाचा, पैसे मिळवण्याचा राजमार्ग समजतात. आजचे शिक्षक विद्यार्थ्यांमध्ये भेदभाव तर इतका करतात की हा गरीब, हा श्रीमंत, हा 'हुशार' तर हा 'ढ', ही आमदाराची मुलगी तर; तो बड्या बिझनेसमनचा मुलगा. मग ह्या विद्यार्थ्यांकरवी आपला स्वत:चा स्वार्थ साधून घेण्यासाठी ते त्यांची हाजी-हाजी करतात आणि स्वत:च्या पेशाला काळीमा फासतात.

असे म्हणतात की 'गुरूवीना जीवन व्यर्थ आहे' म्हणूनच तर ज्ञानदेवांनी सुद्धा निवृत्तीनाथांना आपले गुरू मानले होते. म्हणतात की 'त्वमेव माता पिता त्वमेव, त्वमेव बंधू सखा त्वमेव, त्वमेव विद्या द्रवीडम् त्वमेव, त्वमेव सर्वम् मम देव देव.'

'तुम्ही हो माता, पिता तुम्ही हो' म्हणजे गुरूंनाच आपल्या आई-वडीलांच्या जागी मानून त्यांचा आदर करा. पण आजचे गुरू काय करतात? आपण रोज पेपरमध्ये वाचतो, ऐकतो की कुठे शिक्षकाने विद्यार्थिनीचा विनयभंग केला तर; कुठे बलात्कार. कधी कुठे एखादी शिक्षिका लहान गोजिरवाण्या अबोध विद्यार्थ्यांना एवढे मारते, शिक्षा करते की शारीरिक इजा तर करतेच; पण त्यांचे मानसिक खच्चीकरणही करते. खरंच हे शिक्षक शिक्षिका गुरू म्हणवण्यास लायक आहेत का? कुठे चाललाय आज हा आपला समाज? कुठे गेले ते तळमळीने शिकवणारे शिक्षक, आपल्या विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी झटणारे शिक्षक? कुठे ती पूर्वीची गुरूकुल परंपरा आणि कुठे आजच्या ह्या शिक्षणाचा बाजार करणाऱ्या शाळा?

सुदैवाने अजूनही काही शिक्षक, काही शाळा अशा आहेत की ज्यांना आपण गुरुकुलाचा आणि गुरुचा मान देऊ शकतो. आजही असे शिक्षक आहेत म्हणूनच तर महामहीम अब्दुल कलामांसारखे श्रेष्ठ व्यक्तिमत्त्व अजूनही आपल्या शिक्षकांची भेट घेत होते. तर अजूनही काही खेड्यांमधले, गाव-गाड्यांतले शिक्षक एखाद्या हुशार पण गरीब आदिवासी मुलाच्या शिक्षणासाठी धडपडताना दिसतात.

चला तर; आजपासून आपण अशाच शिक्षकांच्या सन्मानासाठी झटूया, प्रार्थना करूया की आजच्या ह्या मूठभर शिक्षकांची, खऱ्या गुरूंची संख्या इतकी वाढू दे की पुन्हा भारत गुरू-शिष्य परंपरा जपणारा एकमेव देश होऊ दे. अशा ह्या सर्व आदर्श गुरूंना गुरूपौर्णिमेच्या शुभेच्छा देत म्हणूया.

'गुरूने दिला ज्ञानरूपी वसा
आम्ही चालवू हा पुढे वारसा.'

# अभिनंदन

-संपादक

यावर्षीच्या आमच्या सदरलेखिका सौ. उर्वशी आनंद धराधर या तीन सप्टेंबर रोजी वयाची साठ वर्षे पूर्ण करीत आहेत. एम. कॉम., सी. ए., आय. आय. बी. झालेल्या उर्वशीताई आंतरजातीय विवाह करून 'परभू' झाल्या; तेव्हा एक छान सांस्कृतिक चलनवलन सुरू झाले. डॉ. श्रीरंग आडारकर. श्री. किशोर रांगणेकर, एकनाथ ठाकूर यांच्यामुळे सारस्वत बँक मोठी झाली. तिला आणखी मोठी करण्यात उर्वशीताईंचा मोठा वाटा आहे. 'प्रभुतरुणा'ने 'प्रत्युष' सादर केले तेव्हा मी किशोर रांगणेकरांशी आर्थिक सहाय्यासाठी बोलले. त्यांनी मान्यता दिलीच. पण त्याची अर्थवाही पूर्ण होण्यासाठी नंतर उर्वशीताईंचे मार्गदर्शन व मदत झाली. कारण त्यांना उपजतच समाजकार्याची आवड आहे, ओढ आहे. बँकेत त्या जनरल मॅनेजर मार्केटिंग आणि मायक्रो फायनान्स या पदावर कार्यरत आहेत. क्रेडिट कार्ड विभाग व ट्रेझरी डिव्हिजन हे नवीन विभाग बँकेत सुरू करण्याचे श्रेय त्यांचेच. कोअर बँकिंग प्रकल्प पूर्ण करून त्या ॲवॉर्डच्या मानकरी ठरल्या. फक्त आपली नोकरीची म्हणून सारस्वत बँक- एवढेच मर्यादित क्षेत्र त्यांनी ठेवले नाही. उपजतच धडाडी, कार्यप्रेम आणि सेवाभाव यामुळे त्या महाराष्ट्र चेंबर्स ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड ॲग्रीकल्चरच्या महिला औद्योगिक संस्थेच्या चेअरमन होत्या. आज त्या रोटरी क्लब, खारच्या अध्यक्षा आहेत. 'आम्ही उद्योगिनी प्रतिष्ठान'च्या त्या मानद सल्लागार आहेत. महिलांना, तरुणांना औद्योगिक विकासासाठी त्यांचे मार्गदर्शन मोलाचे ठरते. 'अच्छे दिन' येण्यासाठी असे मार्गदर्शन आवश्यक असतेच. उर्वशीताई असे सकारात्मक कार्य करीत असतात. पाठारे प्रभु चॅरिटिझच्या शतकमहोत्सवी समारंभात तत्कालिन मुख्यमंत्री माननीय विलासराव देशमुखांच्या स्वागतप्रसंगी उर्वशीताईंनी निवेदक म्हणून भूमिका पार पाडली होती. आज त्या पाठारे प्रभूंच्या प्रत्येक संस्थेत कधी समारंभाच्या अध्यक्षा, कधी सहभागी सभासद, कधी देणगीदार म्हणून कार्यरत असतात. 'प्रभुतरुणा'तील त्यांचे 'अर्थसंवाद' हे सदरलेखन अत्यंत मार्गदर्शक असे असते. असा अर्थसंवाद 'लोकसत्ता', 'मुंबई सकाळ', सारख्या वृत्तपत्रातूनही त्या साधत असतात. निखील वागळेंच्या टी. व्ही. वरील चर्चेत त्या अर्थतज्ञ म्हणून सहभागी झालेल्या आहेत. तसेच दूरचित्रवाणीवरही माननीय जयंत पाटील (महाराष्ट्राचे भूतपूर्व अर्थमंत्री) यांच्यासह त्या सहभागी होत्या. परवा त्यांच्याशी बोलताना सहज मी म्हटले की, 'नोकरीत सेवावाढ घेणार का?' तर लगेच म्हणाल्या, 'छे!छे! इतर सामाजिक, आवडीची कामं पुष्कळ पडली आहेत. तेव्हा आता निवृत्त झाल्यानंतर त्या कामांना वेळ देता येईल.' समाजकार्याची तळमळ असलेल्या उर्वशीताईंना आपल्या आवडीच्या समाजकार्यात मन:पूत वेळ घालविता यावा म्हणून मन:पूर्वक शुभेच्छा. प्रकृतीस्वास्थ्यही लाभून 'आनंदी' जीवन जगण्यासाठी सर्वप्रकारची सकारात्म मानसिकता त्यांना सातत्याने लाभो ही शुभेच्छा. वयाच्या साठीनंतर पुन्हा नव्याने एक, दोन अशी वर्षे मोजली जातात; म्हणजे आता त्यांनी दुसऱ्या तारुण्यात पदार्पण केले आहे. त्याचा आस्वाद घेत 'प्रभुतरुणा'बरोबरचे त्यांचे नाते वृद्धिंगत होवो!

## आवाहन

प्रभुतरुणाने जून महिन्यात एक महोत्सव करण्याचे ठरवले आहे. त्यात 'प्रभुतरुण गौरव सन्मान' देऊन चित्रकार/ साहित्यिकाला सन्मानित करण्यात येईल. त्यासाठी कथा, कविता, चारोळी, वात्रटिका, व्यंगचित्र, ललितलेख, वैचारिक लेख, विनोदी लेख आमच्याकडे लवकरात लवकर पाठवावेत. शेवटची तारीख ३१ डिसेंबर ही आहे. या स्पर्धेत आयोजक सहभागी असणार नाहीत. कृपया प्रतिसाद द्यावा.

## पाहिजे

'प्रभुतरुणा'च्या सुयोग्य कार्यवाहीसाठी (Administrative Work) एक जाणता कार्यकर्ता पाहिजे. त्याला योग्य तो मोबदला दिला जाईल. इच्छुकांनी पुढील क्रमांकावर संपर्क साधावा.

प्रा. सुहासिनी कीर्तिकर- ९८२०२५६९७६
डॉ. सुरेखा धुरंधर- ९८२१०३२२७२

लेख क्रमांक ८

# अग्निहोत्र - ३

## रोगराई अन् प्रदूषण रोखण्यास अग्नीची उपासना

-सौ. विजयश्री नवलकर

अग्निहोत्र जीवन पद्धतीलाच पाश्चात्य देशात 'होमोथेरेपी' असे नाव देण्यात आले आहे.

**होमोथेरेपी**

अग्निहोत्र हा मूलभूत यज्ञ असून त्याचा निसर्गाच्या तालावर सुपरिणाम होत असतो व त्यामुळे वातावरणशुद्धी होऊन मानवाला सौमनस्य मिळते असा निष्कर्ष वैज्ञानिकांनीसुद्धा काढला आहे. मंत्रपठण हा या होमाचा एक अविर्भाज्य भाग आहे. त्यामुळे हवेत कंपने होऊन मंत्रपठण वातावरणात खूप दूरवर पोहोचू शकते. मन एकाग्र होण्यास याचा फार उपयोग होतो.

विशिष्ट पद्धतीने उच्चारलेले सूर्योदय व सूर्यास्ताच्या वेळचे मंत्र व होमामुळे निर्माण झालेला सुगंधीत वायू यामुळे फार मदत होते. त्याचे दृश्य परिणाम मानवी मनावरच काय; पण वनस्पतीवरही होतात. हा अनुभव आहे. अग्निहोत्राच्या वातावरणात वनस्पती निरोगी राहते. इतकेच नव्हे तर; त्यांची वाढ जोमाने होते. बालकांच्या मानसिक आजारात सुधारणा होते. हे यापूर्वीच सांगितले आहे. मानवी मनावर विचारशक्तीवर भावना, इच्छा, आकांक्षा यांना एक सोज्वळ वळण लागते. मन व शरीर स्वच्छ वातावरणात राहिल्याने आरोग्य चांगले राहते. अग्निहोत्र हे घरोघरी प्रेमाचा संदेश पोहोचवणारे एक अद्‌भूत शस्त्र आहे. म्हणून पाश्चिमात्य देशात याला (अग्निहोत्रास) 'वंडर वेपन' म्हणतात.

अमेरिकेत १९७२ पासून अग्निहोत्राचा प्रसार सुरू झाला व मे १९७३ पासून सत्संग नावाचे पाक्षिक वॉशिंग्टनमधून नियमित प्रसिद्ध होत आहे. मॅडिसन व्हर्जिनिया येथील परमधाम हे जगातील पहिले अग्निमंदिर. या ठिकाणी कुठल्याही धर्माच्या देवाची मूर्ती नाही. फक्त सकाळ व संध्याकाळ सूर्योदय व सूर्यास्त यावेळी अग्निहोत्र होत असते. येथे फक्त अग्निहोत्र साहित्य व बसण्यासाठी चटया असतात, येथील अग्निहोत्र करणारे लोक संस्कृत मंत्र शिकून घेतात. त्याचा उच्चार बरोबर व्हावा म्हणून ते फार सतर्क राहतात.

बल्टीमोर येथे अशाच तऱ्हेचे अग्नीमंदिर श्री जॉन ब्राऊन या अमेरिकन गृहस्थाने बांधले आहे. त्याला यज्ञशाला म्हणतात. या ठिकाणी ९ सप्टेंबर १९७८ पासून महामृत्युंजयाचा अखंड यज्ञ चालू आहे. अग्निहोत्र न थांबता हे लोक स्त्री-पुरुष सवडीने भाग घेतात. जगात कुठेही अशा तऱ्हेचा यज्ञ चालू नाही. यज्ञशाळा प्रशस्त असून मध्यभागी यज्ञकुंड आहे व जवळच गाईच्या गोवऱ्या, गाईचे तूप, घड्याळ इ. साहित्य ठेवले आहे. यज्ञ करणाऱ्याने येथे सर्वशक्ती केंद्रीत केली आहे. त्या वातावरणाचे सुपरिणाम त्यांना जाणवतात. अग्निहोत्राचा प्रसार जगभर करण्यासाठी अमेरिकेतील तरुण बाहेर पडले आहेत. या संस्थेला 'फाईव्ह फोल्ड पाथ मिशन' असे म्हणतात. कै. वसंतराव परांजपे हे परमपूज्य गजानन महाराज (अक्कलकोट) यांच्या आज्ञेनुसार हे कार्य करत होते. येथे अग्निहोत्र प्रेस व अग्निहोत्र युनिव्हर्सिटीची स्थापना केली. अग्निहोत्राचा मनावर होणारा परिणाम व भस्माचा औषधांसाठी उपयोग कसा करतात हे ते सांगत असत. त्याप्रमाणे गाईच्या गोवऱ्यांचे भस्म इतकी ताकद देतो हे मी स्वत: अनुभवलेले आहे.

१९८५ साली माझे स्पायनल कॉर्डचे (म्हणजेच २ स्लीप डिस्कचे) ऑपरेशन झाले. मला डॉक्टरांनी एक वर्ष रजा घेण्यास सांगितले होते. मी स्वत: गादीवर झोपलेली दिसतही नव्हते इतकी बारीक झाले होते. मला खूप थकवा आला होता. परंतु रोज सकाळी व संध्याकाळी मी झोपूनच अग्नीकुंडात आहुती देत होते. त्याचप्रमाणे हळूहळू झोपूनच महामृत्युंजयाचा मंत्र बोलून आहूती देत होते. माझ्या अंगात अग्नीच्या उर्जेने तीन महिन्यातच ताकद आली आणि मी कामावर रुजू झाले. डॉक्टर आनंद परांजपे मला म्हणाले, 'तुझ्या जबाबदारीवर मी तुला फिटनेस सर्टीफिकेट देतो.' आणि या अग्नीच्या उपासनेने मला शरीराने व मनाने काम करण्यास योग्य ताकद मिळाली.

अग्नीची उपासना कुठल्याही धर्मातून आलेली नाही. मानवाने सामंजस्यपणे जगावे म्हणून प्रदूषित वातावरणापासून दूर राहावे यासाठी हे एक साधन आहे. अग्नीमंदीरे ही लवकरच लोकांना आश्रयस्थान वाटतील. या पुढील काळात संहार वाढेल. शहरे उध्वस्त होतील अशी पूर्वसूचना सत्संगात दिली होती. त्याचा अनुभव आपल्याला आता येतोच आहे. शेती व फळबागेसाठी होमाथेरॅपी अग्निहोत्राच्या वातावरणाचा परिणाम व भस्माचा उपयोग शेती सुधारण्यास होतो. याचा अनुभव पुष्कळ परदेशातील लोकांनी घेतला आहे. रासायनिक खतांच्या वापराने जमिनीचा कस कमी होतो. अग्निहोत्राच्या भस्मामुळे शेतीसाठी पोषक द्रव्ये मिळतात. झाडांची रोगप्रतिकारक शक्तीही वाढते असा अनुभव आहे.

वाई येथील श्री. के. बी. जमदाडे यांनी कलिंगडाचे पीक घेण्यासाठी अग्निहोत्राचा उपयोग केला. भात शेतीसाठीही त्यांनी या पद्धतीचा उपयोग करून भरपूर पीक घेतले (१९७९)

कानपूर येथे चंद्रशेखर आझाद कृषी विद्यापीठाचे शास्त्रज्ञ श्री. एल. एन. मित्रा यांनी रसायनी खत, इतर कृत्रीम खत व अग्नीहोत्राच्या राखेचे खत या सर्वांचा वेगवेगळ्या प्रकारे प्रयोग केला. धान्य, पिके व वनस्पतींवरसुद्धा केला आणि तुलनात्मक अभ्यास करून सिद्ध केले की यज्ञाची म्हणजेच अग्नीहोत्राची राख इतर राखेपेक्षा प्रभावी आहे, तर अशी ही प्रयोगसिद्ध अनुभवसिद्ध होमोथेरेपी आहे.

फोन: ९८३३३१७९७३

*

## पाठारे प्रभु महिला समाज

पाठारे प्रभु महिला समाजाचा शताब्दीवर्षाचा सांगता समारोह रविवार, दिनांक ४ ऑक्टोबर, २०१५ रोजी यशवंत नाट्यगृह, माटुंगा येथे 'ढॅण्डढॅण्ड' या नाट्यप्रयोगाने साजरा होईल. या नाट्यप्रयोगाच्या सन्मानिका शताब्दीसमारंभाच्या देणगीदारांना दिनांक २० सप्टेंबर २०१५ नंतर पाठविल्या जातील. देणगीदारांनी नाटकाला जरूर जरूर यावे. या नाटकासाठी इच्छुक असलेल्या; पण देणगीदार नसलेल्यांनाही प्रवेशिका सशुल्क उपलब्ध असतील; असे महिला समाजाच्या पदाधिकाऱ्यांनी कळविले आहे. या संधीचा लाभ घ्यावा.

## पाठारे प्रभु सोशल समाज

### अभंगयात्रा

शनिवार, दिनां १ ऑगस्ट रोजी ठाकुरद्वार येथील व्यंकटेश मंदिरात सोशल समाजाने 'अभंगयात्रा' भरविली. दरवर्षी होणाऱ्या या कार्यक्रमाला सहभागी कलाकार आणि श्रोत्यांचा उत्तम प्रतिसाद लाभला. सोशल समाजाचे विश्वस्त असलेल्या श्री. माधव जयकरांनी प्रारंभिक प्रस्तावना करून सोशल समाज 'अभंग' असल्याचे सांगितले. सोशल समाजाध्यक्षा स्वाती राणे यांनी उपस्थितांचे स्वागत केले आणि नेहमीप्रमाणे कार्यक्रमाचे उत्तम संचालनही केले. कलाकारांच्या सरावासाठी त्यांनी आपले निवासस्थान उपलब्ध करून दिले होते; तर गिरगावात श्री. प्रदीप राणे आणि सौ. मेघना राणे यांनी आपल्या घरी कलाकारांच्या सरावासाटी सोय केली होती. कार्यक्रमाची सुरुवात आदिती विजयकरांच्या गणेशस्तवनाने झाली. प्रणाली आणि वरुण राणे हे बालकलाकार या अभंगयात्रेत सहभागी होते. त्यामुळे भविष्यातही अभंगयात्रा चालू राहण्याचे ते सुचिन्ह होते. एकूण पंचवीस कलाकारांचा या यात्रेत सहभाग होता. अमेरिकेहून नुकतेच भारतात आलेल्या पं. सुजन राणे यांनी 'इंद्रायणी काठी' आणि 'सौभद्र'मधील छोटा गंधर्व यांनी गायलेले गुरुस्तवन गाऊन समारंभाला भरजरी किनार दिली. कारण ते अचानकपणेच या यात्रेत सहभागी झाले होते. इतर कलाकारांनीही यात्रा अधिक रंगतदार केली. त्यात डॉ. हर्षद विजयकर यांचे 'माऊली', राजन प्रधानांचा 'विठूचा गजर', सौ. रॉनिका विजयकरांची 'उठी गोपाळा' ही भूपाळी, क्षमा कोठारे-रजनी कोठारे-योगिता नवलकर यांची भैरवी यांनी यात्रा रंगतदार केली. सौ. सुहास विजयकरांनी स्वामी समर्थांचा 'तारक मंत्र' म्हटला. या यात्रेत प्रणाली राणे, वरुण राणे, आदिती विजयकर,योगिता नवलकर, अमृता कोठारे, तन्मयी विजयकर, डॉ. वैजयंती अजिक्य, अक्षदा तळपदे, रजनी कोठारे, डॉ. हर्षद विजयकर, सुरुपा राणे-देवरूखकर, स्नेहा राणे, सीमा कीर्तिकर, चिंतामणी कीर्तिकर, प्रदीप राणे, सुहास विजयकर, वीणा अजिंक्य, शीतल कोठारे, रॉनिका विजयकर, विद्युत नायक, देवश्री धुरंधर, राजन प्रधान, पं. सुजन राणे, क्षमा कोठारे हे गायक कलाकर सहभागी होते. तबल्याची साथ प्रदीप राणे आणि अवधूत चौबळ यांची होती. तालवाद्यावर श्री. मांद्रेकर होते. श्री. प्रदीप राणे यांनी दृकश्राव्यचित्रणाची व्यवस्था केली. या यात्रेत समाजाचे विश्वस्त श्री. अजित तळपदे यांनी पेढ्यांचा प्रसाद देऊन समारंभ गोड केला; तर श्रीमती प्रमिला तळपदे यांनी सर्वांना कॉफी देऊन तहान भागवली. श्री. अभिजीत विजयकरांनी श्री. व्यंकटेशाला पुष्पहार घालून प्रसन्न केले. कार्यक्रमाची ध्वनियोजना बाबू साऊंड यांनी केली. दरवर्षी यशस्वीपणे होणारी ही अभंगयात्रा अशीच उत्तरोत्तर 'अभंग' राहो.

*

## प्रभु तरुण आश्रयदाते

१) सौ. विमल व श्री. माधव नायक,
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर,
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिक्य
१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे,
कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर,
कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे
यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व
कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक
३२) कै. सौ. विजया व श्री. प्रकाश माधव नायक या त्यांच्या आईवडिलांच्या स्मृत्यर्थ उन्मेष प्रकाश नायक
३३) सौ. वृंदा आणि श्री. शाम विनायक जयकर
३४) कै. श्रीमती जयश्री आणि कै. श्री. जयवंत विश्वनाथ कीर्तिकर स्मृत्यर्थ
श्री. उमेशचंद्र जयवंत कीर्तिकर
३५) कै. श्रीमती प्रतिमा आणि कै. श्री. धाकलेश्वर बाळाजी जयकर स्मृत्यर्थ
सौ. सुप्रिया उमेश कीर्तिकर

## प्रभुतरुणास देणगी

✶ कै. श्रीमती सुलोचना मधुकर नानुजी नवलकर यांच्या स्मरणार्थ श्री. जय भोलानाथ नायक यांजकडून रु. १००१/-

✶ कै. रवीन्द्र रामराव मानकर यांच्या पुण्यस्मरणार्थ श्रीमती लता सत्येंद्र मानकर, सौ. स्मिता प्रफुल्ल राणे, सौ. नीता दिलीप अजिक्य आणि सौ. रेश्मा राजेश मानकर यांजकडून रु. ५००/-

## अभिनंदन

✶ 'प्रभुराम जयराम' हा प्रभुराम जोशींवरील ग्रंथ प्रकाशित झाला. त्याचे संपादन मृदुला प्रभुराम जोशी यांनी केले आहे. मृदुलांच्या 'रीतिपुस्तका'चे सर्वत्र स्वागत होत आहेच.

✶ मितेश राजशेखर राणे हा विलेपार्ले महिला संघ प्राथमिक शाळेचा विद्यार्थी. महाराष्ट्र बोर्डातर्फे मार्च १५ मध्ये झालेल्या माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत मितेश गुणवत्ता यादीत झळकला. अभिनंदन.

## पाठारे प्रभु महिला समाज

समाजाचा शताब्दी वर्षाचा वार्षिक अहवाल प्राप्त झाला. शताब्दी सोहळ्याला साजेल अशी या अहवालात रंगीत चित्रे आहेत. मुखपृष्ठ, मलपृष्ठही चित्रमय रंगीत झाले आहे. शताब्दी महोत्सवप्रसंगी काढलेली स्मरणिकाही प्राप्त झाली. संस्थेला मन:पूर्वक शुभेच्छा. या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा आणि पंचवार्षिक निवडणूक १३ सप्टेंबरला आहे. याच दिवशी चित्रकला स्पर्धाही आहे. या सगळ्याचा वृत्तान्त पुढील अंकी.

(पान २ कॉलम ४ वरून)

व बेल पिंडीवर वाहून 'शिव-लीलामृत' वाचण्यास सुरुवात केली. नंतर डोळे मिटून प्रार्थना केली.

हे सारे आटपून ते एकदाचे देवळाबाहेर आले. ज्या ठिकाणी पिशाच्चाची रजा घेतली होती त्याच जागेवर पिशाच्च त्यांची वाट बघत थांबले होते.

'मादवा, आज तू फार उशीर केलास. नेहमीपेक्षा जास्त, नाही का?'

'नाही. तेवढाच. पण आपण का थांबतात माझ्यासाठी? गरज नाही. मी माझा समर्थ आहे. माझा शंभूनाथ आहे माझे रक्षण करण्यास.'

'अरे, आहेत की काही माणसे तुझ्या वाईटावर. मी तुझे रक्षण केवळ माझ्या हद्दीमध्ये करू शकतो. आम्हाला काही मर्यादा आहेत. आम्हाला देखील वेळ आणि काळाचे बंधन असते. तुला आयुष्यभर मी पुरणार नाही, मग नंतर तुझे कसे होणार?'

त्या वटवृक्षापर्यंत आता ते पोहोचले होते.

'मी झाडापलिकडे येऊ शकत नाही. सुखरूप पुढे जा, मी सांगतो त्याचा विचार कर आणि असा रात्री-अपरात्री येऊ नकोस.' एवढे बोलून पिशाच्चाने माधवांचा निरोप घेतला. माधवरावांनी मौन राखले. जसे आले होते तसेच वडाच्या झाडावर गेले.

हे असे दोघांचे एकमेकांबरोबरचे संबंध किती काळ राहिले. महिने, वर्ष- देव जाणो.

एक दिवस माधवराव रेल्वे इंजिनातून इलेक्ट्रिक केबल घालत असलेल्या कामाची देखरेख किंवा कोणत्यातरी यंत्र बसवण्याची पाहणी करीत असताना त्यांचा तोल सुटला. ते इंजिनाबाहेर फेकले गेले आणि एका खड्ड्यात पडले. हा खरोखर एक अपघात होता का आणखी काही? त्यांना कोणी ढकलले तर नसेल? का कोणी अघोरी विद्येचा प्रयोग केला? देव जाणो!

सर्व माधवरावांचे कुटुंब गोंडल सोडून तातडीने मुंबईस रवाना झाले. माधवराव गोंडलमध्येच वारले की मुंबईत हेही कोणास ठीकसे माहीत नाही. पण सारे मुंबईत आले एवढे मात्र खरे. विचारणार तरी कोणास? ९ मुलांपैकी २ आज हयात आहेत. बहीण व भाऊ, दोघेही नव्वदीच्या घरात. त्यांच्याकडे विचारणा करणे योग्य वाटते का?

(क्रमश:)

फोन नं. ७५०६३७६७४६
email- vbt1946@yahoo.co.in

## प्रभुतरुणाची डायरी

### आत्याबाई नाव बोला

| | |
|---|---|
| ८-८-१५ | कु. सायरा यश तळपदे |

### मरण

| | | | |
|---|---|---|---|
| ३१-७-१५ | विलोभना गोविंदराव आगासकर, | वय ७२, | चेंबूर |
| ०१-८-१५ | श्री. प्रताप सुंदरराव तळपदे, | वय ७९, | ग्रँटरोड |
| ०८-८-१५ | श्री. पुष्पसेन मोरेश्वर तळपदे, | वय ९५, | सांताक्रूझ |
| १४-८-१५ | श्रीमती नीला पांडुरंग नवलकर, | वय ८७, | सांताक्रूझ |
| १६-८-१५ | श्री. अरुण मोरेश्वर राणे, | वय ७९, | गोरेगांव |

## चुकीची दुरुस्ती

गतांकी 'नारळसाखर दिला' या सदरात २-४-१५ कु. श्रद्धा विनोद कोठारे, श्री. सनेश आनंद परब (आं.ज्ञा.) असे कृपया वाचावे. चुकीबद्दल दिलगीर आहोत.

## आठवणींना उजाळा द्या

१४-४-१९८३ साली निघालेली पाठारे प्रभूंची शोभायात्रा समस्त परभांना संगणकावर खालील संकेतस्थळावर पाहता येईल.

https://plus.google.com/photos/101959808523840481147/albums/6185861775198382961?authkey=CL2500aq84GhFw

या संकेतस्थळासाठी श्री. अजय मोतीलाल कीर्तिकर (लंडन) आणि श्री. इंद्रसेन आनंदराव धुरंधर यांनी विशेष परिश्रम घेतले. सौ. उषा जोतांद्र अजिक्य (तळेगाव) यांनी तसे कळवले आहे.

⁕

## दखल

मुंबई मराठी साहित्य संघाच्या अष्टदशक पूर्तीनिमित्त डॉ. रा. अ. तथा बाळ भालेराव यांची दृकश्राव्य मुलाखत आम्ही घेतली. साहित्य संघाच्या जुन्या स्मृतींना उजाळा देताना ते म्हणाले, ''नागर रंगमंचावर तमाशासदृश नाटक साहित्य संघाने पहिल्यांदा आणलं. त्यात नारायण झावबा आणि हंसा वाडकर यांच्या भूमिका होत्या. नारायण झावबांनी हे नाटक रंगमंचावर आणण्यासाठी अपार धडपड केली.'' कै. श्री. नारायण झावबांच्या नाट्यक्षेत्रातील कर्तृत्वाची ही नोंद अभिमानास्पद आहे.

## परीक्षेतील सुयश

**एस्. एस्. सी.**
श्री. वीर तुषार नवलकर, ४४९/५००
श्री. कुणाल शशांक तळपदे, ४०६/५००

**एच. एस. सी. (कॉमर्स)**
श्री. अभिजीत भूषण प्रधान ५६३/६५०
श्री. निमिष नीलेश विजयकर
४५२/६५०, ६९.५४%

**बी. कॉम (सेमिस्टर ६)**
श्री. प्रथमेश राजेश धुरंधर ७५ %

**बी. फार्म**
**कु. सायली मिलिंद धराधर, गुणवत्ता वर्ग**

**बी. एम्. एस.**
कु. शिबानी सुनील नवलकर,
प्रथम वर्ग 'ए' ग्रेड

**बी. एम्. एम्.**
कु. प्रियांका अजित नवलकर,
प्रथम वर्ग 'ए' ग्रेड

**बी. डी.एम.**
कु. मोनिका प्रदीप वेलकर
९७५/१६००, ६०.९%

**बी. ई.**
श्री. जीत विनीत जयकर
४२८/७५०, प्रथम वर्ग

**एम्. ई. (इलेक्ट्रीकल)**
श्री.मिथील प्रदीप धुरंधर (यु.एस.ए.)

**डिप्लोमा इन अर्ली चाइल्डहूड-केअर, एज्युकेशन अँड ॲडमिनिस्ट्रेशन**
श्री. किनाल कोठारे

हे मासिक मुद्रक, प्रकाशक श्रीमती सुहासिनी कीर्तिकर यांनी मालक बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुण करिता मे. स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ, शाह अँड नाहर इंडस्ट्रीयल इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४००१०२ येथे प्रकाशित केले.

संपादक: श्रीमती सुहासिनी कीर्तिकर RNI NO. 14613/67